सेवा योजन कार्यालय

---

शासनाच्या चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचा-यांच्या मुलीस/अविवाहित मुलीस शासनाच्या सेवेत नोकरीसाठी सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याबाबत ......

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक : आरटीआर-१०८०/४१९-१९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १४ एप्रिल १९८१.

## शासन परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आरटीआर-१०६८/सी-१००९१-ज, दिनांक २ डिसेंबर १९६८ च्या शासन परिपत्रकानुसार तृतीय व चतुर्थ श्रेणीतील एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरिता भरण्यात येणा-या पदांवर सेवा योजन कार्यालयाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांतूनच नेमणूक करावी असे बंधन आहे. प्रस्तुत आदेश शिथिल करून चतुर्थ श्रेणीतील निवृत्त कर्मचारी अथवा या श्रेणीतील एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणारे कर्मचारी यांच्या मुलास/अविवाहित मुलीस शासन सेवेतील चतुर्थ श्रेणी पदावरील नोकरीसाठी विशेष बाब म्हणून सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट खालील शर्तींवर रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

(१) उमेदवारांनी चतुर्थ श्रेणीतील पदांकरिता विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हता, वय या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(२) चतुर्थ श्रेणीतील निवृत्त किंवा एक वर्षाच्या कालावधीमध्ये निवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या पत्यत एका मुलास किंवा अविवाहित मुलीस पत्यत चतुर्थ श्रेणीतील पदांवरील नेमणुकीकरिता सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट रद्द करण्याची सवलत दिली जाईल.

(३) सेवा योजन कार्यालयाच्या शिफारशीची अट जरी रद्द करण्यात आली असली तरी अर्जदार उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी आपले नाव स्थानिक सेवा योजन कार्यालयामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

न. वे. सुंदररामन,
विशेष सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

कृ.मा.प.

शा.म.मु.रोटा-एक्स-१३४(५,०००-४-८१)